संक्षिप्त

विदर्भातील शाळा २२ जूनपासून

नागपूर : विदर्भातील शाळा आता १५ जूनऐवजी सोमवार, २२ जून २०२६ पासून सुरू होणार आहेत, तर उर्वरित महाराष्ट्रातील शाळा नेहमीप्रमाणे सोमवार, १५ जून २०२६ पासूनच नियमित वेळेत सुरू होतील, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. आधी सर्व शाळा १५ जून रोजी सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपवून नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने ९ जून २०२६ रोजी एक अत्यंत महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. या सुधारित आदेशानुसार, विदर्भातील तीव्र उन्हाळा आणि वाढते तापमान लक्षात घेता तेथील शाळा उशिराने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भातील तापमानाचा पारा वाढलेला असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, ही बाब समोर आल्याने निर्णय घेतल्याचे सांगितले जाते.

मेश्राम मनरेगा आयुक्त, माधवी खोडे सचिवपदी

नागपूर : अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांची महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) आयुक्तपदी अनिता मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त विभागीय आयुक्त माधवी खोडे-चवरे यांची बदली अल्पसंख्याक विभागाच्या सचिव पदावर करण्यात आली.

ऋषभ सुटे यांचे निधन

नागपूर : सुभाषनगर, कामगारनगर परिसरातील ऋषभ किशोर सुटे (३१) यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, बहीण, मुलासह आप्तपरिवार आहे.

आदित्यला १०० पर्सेंटाईल गुण

एमएचटी सीईटी प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे एप्रिल २०२६ मध्ये घेतल्या गेलेल्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी तंत्रशिक्षणाच्या अंतर्गत असलेल्या औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पहिल्या संधीच्या पीसीबी सीईटी प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला. सीईटीमध्ये एकूण ११ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल गुण मिळवले आहेत. यात नागपूर येथील आदित्य अभिषेक सोमाणी याचा समावेश आहे. तो वर्धमाननगर येथील सेंटर पॉईंट स्कूलचा विद्यार्थी आहे.

पीसीबी समूहाच्या पहिल्या संधीच्या या सीईटी परीक्षेमध्ये ११ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाईल गुण मिळाले आहेत. यातील ८ विद्यार्थी असून ३ विद्यार्थिनी आहेत. सर्व ११ विद्यार्थी हे महाराष्ट्रातीलच आहेत.

आई, वडील आणि भावासह आदित्य.

१०० पर्सेंटाईल गुण मिळवणारे विद्यार्थी

पीसीबी समूहाच्या पहिल्या संधीच्या या सीईटीमध्ये एकूण ११ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल गुण मिळवले आहेत. राज्यातील नागपूर येथील आदित्य अभिषेक सोमाणी, पालघर येथील कुमारी झील हितेश छेडा, मुंबई शहर येथील ॲशले कोस्टॅनसीओ फर्नांडिस,कोल्हापूर येथील अथर्व उत्तम गडदे, सोलापूर येथील कुमारी प्रतीक्षा दीपक गाढवे, धुळे येथील अथर्व अविनाश काकुळडे, सांगली येथील सार्थक महेश पाटील, कोल्हापूर येथील साहिम सादिक पटवेगर आदीचा समावेश आहे. या निकालामध्ये राज्याबाहेरील एकही विद्यार्थी ९०० टक्के पर्सेंटाईल मिळवणारा नाही.

सदरचा निकाल विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाची सामाईक प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल. सीईटी प्रवेश परीक्षा दिनांक २१ एप्रिल ते २६ एप्रिल रोजी सहा दिवसांमध्ये ११ सत्रात घेण्यात आली.

या परीक्षेला एकूण २ लाख ८४ हजार ०६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ११ सत्रांत मिळून २ लाख ६३ हजार २१३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये १ लाख ३ हजार ३६० विद्यार्थी होते व १ लाख ५९ हजार ८४८ विद्यार्थिनी होत्या, तर ५ तृतीयपंथीय होते. यामध्ये विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींची संख्या जास्त आहे. परीक्षेला ९२.६६ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

नियमित अभ्यासामुळे सीईटी परीक्षेमध्ये यश मिळाले. या यशात शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.
- आदित्य सोमाणी

साठ दिवसांनंतर फलाट-२ सुरू

नागपूर : मध्यवर्ती नागपूर रेल्वेस्थानकावरील फलाट क्रमांक २ तब्बल ६० दिवसांनंतर पुन्हा प्रवाशांसाठी खुला करण्यात आला. मंगळवारपासून या फलाटवरील रेल्वे वाहतूक पूर्ववत सुरू झाली. त्यामुळे अजनी स्थानकावरून चालवण्यात येणारी नागपूर-मडगाव-नागपूर एक्स्प्रेस पुन्हा नागपूर स्थानकातूनच धावणार आहे. बांधकामासाठी ८ एप्रिलपासून हा फलाट बंद ठेवला होता.

या काळात फलाट क्रमांक २ वरून धावणाऱ्या अनेक गाड्यांचे संचालन अन्य फलाटांवरून किंवा अजनी स्थानकावरून केले होते. फलाट २ पुन्हा कार्यान्वित झाल्याने सर्व गाड्यांचे थांबे आणि संचालन पूर्ववत करण्यात येणार आहे.

रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे नियमित प्रवाशांसह लांब पल्ल्याच्या प्रवाशांचीही गैरसोय दूर होणार आहे.

'एनएसएस', 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांची मदत घेणार

४६ लाख मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी निर्णय

नागपूर : मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षणाचे (एसआयआर) करण्यात येत आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना सव्वा महिन्यात ४६ लाख मतदारांपर्यंत पोहचायचे आहे. बीएलओंच्या अपुरी संख्येमुळे एनएसएस व एनसीसीच्या विद्यार्थ्यांची मदत घेण्यात येणार आहे.

नागपूर जिल्ह्यात ४६ लाख ४० हजार ८८८ मतदार आहेत. आतापर्यंत ३१ लाख ८६ हजार ६६९ मतदारांची तपासणी झाली. एसआयआरचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वी तपासणीचे काम शंभर टक्के करण्याचा प्रयत्न प्रशासनाचा आहे. प्रत्यक्ष एसआयआर दरम्यान बीएलओ मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांच्याकडून अर्ज नमुना भरून घेतील. त्यानंतर संबंधितांची माहितीही संगणीकृत करायची आहे.

एसआयआरसाठी बीएलओंना घरोघरी जाऊन अर्ज नमुना देऊन तो भरून घ्यायचा आहे. कामासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. वेळ कमी असून काम जास्त आहे. त्यामुळे एनएसएस, एनसीसीच्या विद्यार्थ्यांची मदत घेण्यात येणार आहे.
- रचना इंदुरकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर.

जिल्ह्यात साडेचार हजारांवर बीएलओ आहेत. बीएलओंची संख्या व कामाचा व्याप लक्षात घेता त्यांच्या मदतीसाठी एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांची मदत घेण्यात येण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने प्रशासनाला केल्या आहेत. प्रशासनाकडूनही दोन्ही संस्थेच्या प्रतिनिधींशी संपर्क साधण्यात येत असून त्यांची बैठकही घेण्यात येणार आहे.

आरटीईचे प्रवेश नाकारणाऱ्या स्वामी नारायण शाळेला नोटीस

नागपूर : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम (आरटीई) अंतर्गत २५ टक्के दुर्बल व वंचित घटकातील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश न दिल्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाने वर्धमाननगर येथील स्वामी नारायण शाळेला नोटीस बजावली आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नीलेश गुंड यांनी ८ जूनला जारी केलेल्या पत्रानुसार, आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेअंतर्गत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी निवडप्राप्त विद्यार्थ्यांना स्वामी नारायण स्कूल व्यवस्थापनाने अद्यापही प्रवेश दिला नाही. यासंदर्भात शिक्षण विभागाने यापूर्वी १९ मे, २७ मे आणि ४ जूनला शाळेला पत्रव्यवहार करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, पालकांनी शिक्षण विभागाशी संपर्क साधून शाळेने अद्याप प्रवेश न दिल्याची तक्रार केली. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शाळेला १० जूनपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले. आरटीई कायद्यान्वये प्रवेश प्रक्रिया पूर्ण न केल्यास शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदींचा भंग मानला जाईल. विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवल्याबद्दल मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापनाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येऊ शकते, अशीही ताकीद दिली आहे.

आरटीईचे प्रवेश नाकारल्याने शाळेला नोटीस बजावण्यात आली आहे. ११ जूनला संबंधित शाळेच्या अधिकाऱ्यांना सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.
- नीलेश गुंड, प्राथमिक शिक्षणाधिकारी.

सुरक्षा ठेवीवर १३.१२ कोटींचे व्याज

नागपूर : महावितरणने नागपूर परिमंडळातील ७ लाख ३ हजार ५९० लघुदाब वीज ग्राहकांना दिलासा देत सुरक्षा ठेवीवरील १३ कोटी १२ लाख ७७ हजार ४२८ रुपयांचे व्याज त्यांच्या वीज बिलात समायोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा लाभ नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील लाखो ग्राहकांना होणार आहे.

नागपूर जिल्ह्यातील ५ लाख ९७ हजार ४२८ ग्राहकांच्या खात्यात ११ कोटी ६८ लाख २० हजार ४८४ रुपये, तर वर्धा जिल्ह्यातील १ लाख ३ हजार ६४२ ग्राहकांच्या खात्यात १ कोटी ४४ लाख ५६ हजार ९४४ रुपयांचे व्याज मे आणि जून महिन्याच्या वीज बिलात समायोजित करण्यात येत आहे. रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या दरानुसार त्यावर व्याज दिले जाते. ज्यांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा भरणा केलेला नाही, त्यांची थकबाकी सध्या मिळणाऱ्या व्याजातून वळती करण्यात येते.

ज्यांना दूर ठेवले, त्यांनाच पुन्हा जबाबदारी!

वादग्रस्त पोलीस शिपायांच्या कार्यप्रणालीवर आक्षेप

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : कारवाई टाळण्यासाठी वाठोडा ठाण्यातील महिला पोलीस उपनिरीक्षक प्रणाली बेनकेला अलीकडेच लाच मागितल्या प्रकरणात अटक झाली. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांची प्रतिमा डागाळली गेली आहे. आता गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे निलंबित तीन पोलीस शिपायांना पुन्हा महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आल्याने पारडी, भांडेवाडी आणि वाठोडा भागात त्यांच्या कार्यप्रणालीविषयी तक्रारी वरिष्ठांपर्यंत पोहोचत आहेत.

कृषी उत्पन्न बाजार समिती, धान्य गोदामे आणि मोठ्या व्यापारी व्यवहारांमुळे पारडी, कळमना आणि वाठोडाचा परिसर हा घाऊक व्यापाऱ्यांसाठी महत्त्वाचा मानला जातो.

वाळू व गोतस्करांशी कथित संबंध असल्याच्या तक्रारींमुळे तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या कार्यकाळात दोन वर्षांपूर्वी 'पप्पू' नावाने परिचित पोलीस शिपाई निलंबित झाला होता. तसेच सुपारी व्यावसायिकांशी कथित संबंधांमुळे सचिन आणि दिनू नावाचे दोन शिपाई देखील तत्कालीन पोलीस आयुक्तांनी निलंबित केले होते. दरम्यान, निकेतन कदम हे परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त असताना त्यांनी या तिघांना महत्त्वाच्या कामगिरींपासून दूर ठेवले होते. आता कदम यांची अमरावतीत पोलीस अधीक्षकपदी बदली झाली आहे. त्यानंतर त्यापैकी एकाला पारडी पोलीस ठाण्यात तर उर्वरित दोघांकडे भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

तपासात अडसर येऊन नये, म्हणून प्रतिमा डागाळलेल्यांना दूर ठेवणे, सामान्य बाब आहे. मात्र अशांना पुन्हा महत्त्वाच्या पथकात घेतले असेल तर गंभीर आहे. तपासात अनागोंदी कोणत्याही पद्धतीने सहन होणार नाही. त्याच्या उपायुक्तांपर्यंत तक्रारी पोहोतच असतील तर निश्चितपणे माहिती घेऊन संबंधितांवर कारवाई होईल.
- वसंत परदेसी, अतिरिक्त पोलीस आयुक्त (दक्षिण)

नैराश्यातून तरुणीची आत्महत्या

नागपूर : उपचारामुळे नैराश्यात गेलेल्या तरुणीने गळफास घेत आत्महत्या केली. प्रियंका रूपराव गणवीर (२०, रा. आंबेडकर नगर, वाडी) असे मृत तरुणीचे नाव आहे. प्रियंकावर गेल्या काही वर्षांपासून मानसोपचार सुरू होते. उपचाराशी निगडित कागदपत्रे पोलिसांना आढळली. त्यामुळे नैराश्यातून तिने आत्महत्या केली असावी, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.

भावी डॉक्टरचा अपघाती मृत्यू

नागपूर : कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर घरी परतत असताना दुचाकी अनियंत्रित होऊन झालेल्या अपघातात वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या भावी डॉक्टरचा मंगळवारी अपघाती मृत्यू झाला. ही घटना कळमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचभवन खाण भागात घडली. अंशुल राजेंद्र समर्थ (२३ रा. आदर्शनगर) असे दगावलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, अंशुल सोमवारी दुपारी दुचाकीने कळमेश्वरकडे जात होता. चिंचभवन खाण भागात त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर तो खाली कोसळून जखमी झाला. नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. कळमेश्वर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

'एअरटेल'कडून जलवाहिनीचे नुकसान

नागपूर : भूमिगत केबल टाकण्यासाठी खोदकाम करताना एअरटेल कंपनीच्या कंत्राटदाराने वैशालीनगरात जलवाहिनीचे नुकसान केले. त्यामुळे वाहिनीला गळती लागली असून आशीनगर व लकडगंज झोनमधील पाणीपुरवठा बाधित झाला. नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

शहरात विकास प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या उत्खनन व केबल टाकण्याच्या कामांमुळे जलवाहिन्यांचे नुकसान होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. खोदकामापूर्वी महापालिका व ओसीडब्ल्यू कंपनीशी कुठलाही समन्वय न साधल्याने जलवाहिन्यांना तडे जात आहे. मंगळवारी झालेले जलवाहिनीचे नुकसानीची जबाबदारी कंत्राटदाराने स्वीकारली असून दुरुस्तीसाठी सहमतीही दर्शवली. परंतु १० जून रोजी दुरुस्तीच्या कामामुळे वैशालीनगर, फूलवारी शाळा, स्वीमिंग पूल परिसर, आनंद बेकरी परिसरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. दोन दिवसापूर्वी ७ जूनलाही लकडगंज झोनमध्ये अशीच घटना घडल्याने ८ जून रोजी शिवनगर, राम मंदिर परिसर, आभानगर, भोलेश्वर सोसायटी आणि पुनापूर वस्ती येथील सकाळचा पाणीपुरवठा तसेच करारेनगर, भरतवाडा आणि राजा भोज कॉलनी येथील सायंकाळचा पाणीपुरवठा प्रभावित झाला होता.

छिंदवाडा येथून बेपत्ता व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह

नागपूर : मध्यप्रदेशातील छिंदवाडा येथे बेपत्ता म्हणून नोंद असलेल्या तरुणाचा मंगळवारी सावनेर तालुक्यात निर्जनस्थळी मृतदेह आढळला. अत्यंत कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या या मृतदेहाजवळ सापडलेल्या आधार कार्डवरून त्याची ओळख पटली आहे. संदीप आसोलकर (३५, रा. छिंदवाडा, मध्यप्रदेश) असे मृताचे नाव आहे. आसोलकर हे बेपत्ता असल्याची नोंद छिंदवाडा पोलिसांत आहे. तब्येत बिघडल्यामुळे आसोलकर एकटाच तिथे थांबले असावेत. नंतर वेळेवर मदत किंवा पाणी न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. माहिती मिळताच घटनास्थळी न्यायवैद्यक पथकालाही पाचारण करण्यात आले. पथकाला परिसरात नमुने घेताना मृतदेहाजवळ आधारकार्ड सापडले. त्यावरून मृताची ओळख पटली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह वैद्यकीय तपासणीसाठी मेडिकल येथे रवाना केला. त्याच्या अहवालानंतरच आसोलकर यांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

विवाह जुळत नसल्याने तरुणाची आत्महत्या

नागपूर : विवाह जुळत नसल्याने तणावात असलेल्या तरुणाने यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंदिरा मातानगर येथे आत्महत्या केली. राकेश दिलीप यादव (२५) असे तरुणाचे मृताचे नाव आहे. लाकडी बीमला ओढणी बांधून गळफास घेतला. यापूर्वीही त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला.

पेट्रोल, डिझेल विक्रीत वाढ

भारत पेट्रोलियमची नागपूर विभागातील स्थिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने महाराष्ट्रात इंधनाचा अखंड पुरवठा कायम असल्याचा दावा केला आहे. कंपनीने नागपूर विभागातही पेट्रोल, डिझेल आणि द्रवरूप पेट्रोलियम वायूच्या वापरात लक्षणीय वाढ नोंदवली आहे. कंपनीच्या मते, वाढती वाहतूक, औद्योगिक हालचाली आणि व्यावसायिक वाढ यामुळे इंधनाची मागणी वाढत आहे.

नागपूर विभागात मे २०२६ मध्ये पेट्रोलची विक्री ८ हजार ७७२.१३ मेट्रिक टन होती. मागील वर्षी ती ८ हजार १०८.०९ मेट्रिक टन होती. विक्रीत ८.१९ टक्के वाढ झाली. डिझेलची विक्री २१ हजार ५६.८६ मेट्रिक टनांवरून २३ हजार ८६२.७९ मेट्रिक टनांपर्यंत पोहोचली असून, त्यात १३.३३ टक्के वाढ नोंदविली आहे. मे महिन्यात कंपनीने नागपूर विभागात १ लाख ४७ हजार ६७७ घरगुती द्रवरूप पेट्रोलियम वायू सिलिंडर, २ हजार ६८ व्यावसायिक सिलिंडर आणि १ हजार ५३६ मोठ्या क्षमतेच्या सिलिंडरचा पुरवठा केला. सर्व इंधन केंद्रांवर पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचा दावा कंपनीने केला आह, असे कंपनीच्या प्रवक्त्यांनी सांगितले.

सहा दिवसांत ३३६ खड्डे बुजवल्याचा महापालिकेचा दावा

रस्त्यांची दुरवस्था चव्हाट्यावर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : महापालिकेच्या हॉटमिक्स विभागाने पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजवण्याची मोहीम सुरू केली असून ६ दिवसांत ३३६ खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. या दाव्याने शहरातील रस्त्यांची दुर्दशा चव्हाट्यावर आली आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी रस्त्यांवर खड्डे बुजवण्याची मोहीम अधिक गांभीर्याने राबवली जाते. हॉट मिक्स विभागाने शहरातील दहा झोनमध्ये ही मोहीम राबवली. महापालिकेच्या आकडेवारीनुसार १ ते ६ जूनपर्यंत सर्वाधिक ७० खड्डे लक्ष्मीनगर झोनमध्ये बुजवण्यात आले. धरमपेठमध्ये ५०, नेहरूनगरमध्ये ४६, गांधीबागमध्ये ४३, सतरंजीपुरामध्ये २८, मंगळवारीमध्ये २८, धंतोलीमध्ये २५, हनुमाननगरमध्ये २२, लकडगंजमध्ये १३ आणि आशीनगर झोनमध्ये ११ खड्डे बुजवण्यात आले. विभागाने ३ हजार ८२५.९१ चौरस मीटर रस्त्यावरील खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. दरम्यान, अनेक डांबरी रस्त्यांचे आयुर्मान संपले असून केवळ खड्डे बुजवून समस्या सुटणार नसल्याचे एका अधिकाऱ्याने नमूद केले. पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज व दूरसंचार केबलसाठी वारंवार होणाऱ्या खोदकामामुळे अंतर्गत वस्त्यांतील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. खोदकामानंतर पुनर्भरण करताना रस्त्यांवर खड्डे निर्माण होत आहेत. या रस्त्यांचे पुनर्निर्माण करणे हाच एकमेव उपाय असल्याचेही या अधिकाऱ्याने नमूद केले.

NAGPUR

LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

LIC HOUSING FINANCE LIMITED
3 रा मजला, श्री राम टॉवर, एनआयटी बिल्डींग जवळ, सदर, नागपूर - 440 001

मागणी सूचना

रुल 13 (2) सेक्यूटरायझेशन व रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशियल असेट्स व इन्फोर्समेंट सेक्युरिटी कायदा 2002 (SARFAESI ACT 2002) अंतर्गत सूचना.
अनुक्रमांक 1 ते 6 खालील उल्लेखित व्यक्तिंना एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (LIC HFL) च्याअधिकृत अधिका-यांनी कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत पाठविलेल्या रजिस्ट्रार पोस्ट ए/डी नोटीस असलेली पाकिटे पोस्ट खात्याने वेगवेगळी करणे अंकित करुन परत केले आहे.
अशा नोटीस पाठविलेल्या व्यक्तिंना सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोसमेंट रुल्स 2002 च्या नियम 3 अंतर्गत सूचना देण्यात येते की, कर्जाची परतफेड (EMIs) व्दारा (मुद्दल व व्याज) न केल्यामुळे यांची खाते भारतीय रिझर्व्ह बँक ने जाहिर केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार नॉन परफॉरर्मिंग असेट्स (N.P.A.) म्हणून वर्ग करण्यात येत आहे. अशा व्यक्तिंना सूचना देण्यात येत आहे की, त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम जीचा उल्लेख खालील तक्त्याच्या 7 (सातव्या) रकान्यात करण्यात आला आहे. हि नोटीस छापल्याच्या 60 (साठ) दिवसाच्या आत सव्याज परत ने केल्यास (LIC HFL) त्याच्या गहाण ठेवलेल्या मालमत्ता SARFESI कायद्याच्या प्रावधाना अंतर्गत दाव्यात घेतल्या जाईल. त्यानंतर LIC HFL ला सदर मालमत्ता विक्री, भाडेपट्टी किंवा ईतर मार्गाने विल्हेवाट लावायचा अधिकार आहे. याउपर या मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी पुर्वग्रह न ठेवता मालमत्तेचे व्यवस्थापन किंवा ईतर काही मार्ग उपलब्ध असल्यास त्याचा उपयोग करण्याचा अधिकार LIC HFL आपल्याकडे सुरक्षित ठेवते. या प्रक्रियेनंतर मिळालेल्या रकमेच्या प्रथम वापर कर्ज फेडिच्या दिशेने होईल. त्याचप्रमाणे या कारवाईसाठी लागणारा ईतर खर्च ही वसूल करण्यात येईल. यानंतर LIC HFL चे घेणे झाल्यानंतर उरलेली अतिरिक्त रक्कम तुम्हाला परत मिळल. तसेच त्याच्या मालमत्तेच्या विक्रीनंतर पूर्ण परतफेड न झाल्यास LIC HFL ईतर कायदेशीर मार्गाने उरलेली रक्कम वसूल करण्याचा अधिकार आपल्याजवळ कायम ठेवते त्यासाठी डीआरटी/कोर्ट यांचेकडे थकबाकी राशीच्या आणि संभाव्य खर्चाच्या वसुलीसाठी जाण्याचा अधिकार LIC HFL आपल्याजवळ कायम ठेवते. ही नोटीस पाठविणारा अधिकृत अधिकारी SARFAESI कायदा 2002 च्या कलम 13 अंतर्गत सक्षम अधिकारी आहे व यास्तवं सदर सूचना उपर्निदेशित कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत देण्यात आले आहे असे समजावे.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदाराचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचनेचा दिनांक	कर्ज मिळाले (वितरित)	मागणी सूचनेच्या तारखनुसार थकबाकी रक्कम
1.	613000000267	गणेश अशोक वढाई	१६१, रामपूर,जिल्हा परिषद शाळेजवळ, आर्वी,जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र - ४४२९०५	20-05-2026	रु. 12,00,000	रु. 9,12,634.83
2.	613000001142	दिनेश गुलाब लाढे	१०अ, पांढरकवडा, ता. केळापूर, गट क्र. २५/२,पांढरकवडा, ता. केळापूर,जि. यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५३०६.	26-05-2026	रु. 7,50,000	रु. 6,83,968.48
3.	611300006481	राकेश भोकारे	४२, देशमुख लेआऊट, पेट्रोल पंपाच्या मागे, सिंदी (मेघे),सर्वे क्र. ९/१ (जुना क्र. ११६, नवीन क्र.),जि. वर्धा, महाराष्ट्र - ४४२००१.	18-04-2026	रु. 7,00,000	रु. 6,44,963.87
4.	613000000501	दिनेश गुलाब लाढे	१०अ, गट क्र. २५/२,पांढरकवडा, ता. केळापूर,जि. यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५३०६	26-05-2026	रु. 18,00,000	रु. 14,16,405.99
5.	611300001081	गोविंद नंदुजी पवार	३७, नवीन सुभेदार लेआऊट, हुडकेश्वर रोड,नागपूर, महाराष्ट्र - ४४००२५.	18-04-2026	रु. 14,40,000	रु. 6,17,507.95
6.	6001130005443	रितेश सुरेश मेश्राम	३, नागपूर, सर्वे क्र. ६९, फेज क्र. १५,ग्रामपंचायत हळदेगाव, जिल्हा परिषद शाळेजवळ, हळदेगाव,ता. व जि. नागपूर, महाराष्ट्र - ४४१३०२.	15-04-2026	रु. 20,50,000	रु. 20,32,652.49

दिनांक : 10.06.2026, स्थळ: नागपूर
स्वा./- अधिकृत अधिकारी, एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

अंचल कार्यालय, नागपुर
पाल्म रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर 440 001,
फोन:- ०७१२-२५३०६६६, २५६६७८४
ई-मेल: zonagpur@indianbank.co.in

ई-लिलाव विक्री सुचना

सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्तांचे पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम २००२ अंतर्गत, सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी नियम) २००२ च्या नियम 9 (1) नुसार विक्रीची सूचना

सर्व साधारणपणे आणि खासकरून खालील नमूद कर्जदार व जमानतदार याना सूचित करण्यात येत आहे की, इंडियन बँकेकडे अचल संपत्ती / गहाण केलेल्या खाली नमूद मालमत्तेचे ताबा इंडियन बँकेच्या प्राधिकृत अधिका- याने घेतला आहे. सदर मालमत्ता ही सुरक्षित लेनदार खाली दिलेल्या तारखेला "जे आहे जेथे आहे" "जे आहे ते आहे" आणि "जेही काही आहे" या आधारावर विक्री करण्यात येईल खाली नमूद केले कर्जदार आणि जमानतदार संबंधित मालमत्तेसाठी राखिव किंमत आणि बयाणा रक्कम खालील प्रमाणे दिलेली आहे.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ तारीख : 01.07.2026 वेळ : स. 10.00 ते सायं. 05.00 वा पर्यंत

अ. क्र	कर्जदार आणि जमानतदाराचे नाव	स्थावर मालमत्तेचा आणि त्यावर जर काही बोजा असेल तर, त्याचा तपशील आणि ताब्याचा प्रकार व संपत्तीची आयडी BAANKNET	राखीव किंमत, बयाणा रक्कम, बोली वाढीव रक्कम
		श्री टॉकिज गोंदिया शाखा अधिकृत अधिकारी : श्री. प्रभात श्रिवास्तव (CM) मो. नं. 9685063677	
1.	**1. मेसर्स इंडियन अक्वा (कर्जदार) श्रीमती तहेरा बेगम नब्बू शेख (प्रोप्रा) पत्ता -** इमरान शेख, पॉलिटेक्निक कॉलेजच्या मागे, आय. टी. आय मस्जिद परिसर, रजा कॉलनी, तहेरा मंजिल, फुलचूर टोला, फुलचूर, गोंदिया, महाराष्ट्र 441601 **2. श्री इमरान नब्बू शेख (जमानतदार व गहाणदार)** पत्ता - पॉलिटेक्निक कॉलेजच्या मागे, आय. टी. आय मस्जिद परिसर, रजा कॉलनी, तहेरा मंजिल, फुलचूर टोला, फुलचूर, गोंदिया, महाराष्ट्र 441601	**संपत्ती प्रकार : खुला प्लॉट ताबा : प्रत्यक्ष मालमत्ता आयडी : IDIBOIA1** सर्व भाग आणि तुकडा संपत्ती नं. 1711, प्लॉट बेअरिंग गट नं. 428/2/18 प्लॉट नं. 18, एरिया 175 चौ मी तसेच 1889 चौ फुट मौजा सडक अर्जुनी, टी एस नं. 15 पंचायत समिती सडक अर्जुनी, जि. प. गोंदिया हद्दीत, नोंदणी उपजिल्हा सडक अर्जुनी येथे, श्री इमरान नब्बू शेख यांच्या नावावर असलेली, पुढीलप्रमाणे **चतुर्सिमा- पुर्व :** 9 मी. रुदींचा ले-आऊट रस्ता **पश्चिम:** गट नं. 423 (पवन अग्रवाल यांचे शेत), **उत्तर :** प्लॉट नं. 17, **दक्षिण:** प्लॉट नं. 19	राखीव किंमत: रु. 14,50,000/- बयाणा रक्कम: रु 1,45,000/- बोली वाढीव रक्कम : रु 10,000/-
		संपत्ती प्रकार : प्लॉट आणि बिल्डिंग ताबा : प्रत्यक्ष मालमत्ता आयडी : IDIBOIA2 सर्व भाग आणि तुकडा संपत्ती नं. 13/1250, शीट नं. 76 अ, प्लॉट नं. (भाग), क्षेत्रफळ 58.1 चौ मी. (625 चौ. मी.) मौजा पिंडकेपर, टी एस नं. 30 थक नं. 77, मालवीय वार्ड, सरहद नगर परिषद गोंदिया, ता. व नोंदणी उपजिल्हा गोंदिया येथे स्थित, श्री इमरान नब्बू शेख यांच्या नावाने पुढीलप्रमाणे **चतुर्सिमा- पुर्व :** वहाब खा यांची जमीन , **पश्चिम:** अब्दुल गनी अब्दुल करीम शेख यांची जमीन, **उत्तर :** अहमद अली यांचा प्लॉट /जमीन, **दक्षिण:** गली/ रस्ता	राखीव किंमत: रु. 15,00,000/- बयाणा रक्कम: रु 1,50,200/- बोली वाढीव रक्कम : रु 10,000/-

थकीत येणे बाक